राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (पीआयपी) २०१९-२० वर्षातील अनुदानातून सिंधुदूर्ग, नाशिक, नांदेड, लातूर, अहमदनगर, पुणे, नंदुरबार, जालना, वाशिम, रत्नागिरी, चंद्रपूर, अमरावती व हिंगोली या १३ जिल्ह्यांसाठी गर्भाशय मुख कर्करोग निदान व उपचारासाठीची उपकरणे व साहित्य सामुग्रीची खरेदी निविदा प्रक्रियेद्वारे करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०५१९/प्र.क्र.३१९/आरोग्य-७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : १४ जून, २०१९.

वाचा :-

१) सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/NCD/न.क्र.१६०/२६८-२६९/प्रशासकीय मान्यता/१९, दिनांक ०६ मे, २०१९.

२) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील दिनांक १० मे, २०१९ रोजीची मान्य टिप्पणी.

प्रस्तावना:-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर कृती आराखडयामध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत प्राप्त अनुदानातून गर्भाशय मुख कर्करोग निदान व उपचारासाठी लागणाऱ्या आवश्यक यंत्रसामुग्री सिंधुदूर्ग, नाशिक, नांदेड, लातूर, अहमदनगर, पुणे, नंदुरबार, जालना, वाशिम, रत्नागिरी, चंद्रपूर, अमरावती व हिंगोली या १३ जिल्ह्यांसाठी खरेदी करण्याकरीता अंदाजित रक्कम रु.२२६.०३ लक्ष इतक्या रकमेच्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० करीता वार्षिक कृती आराखडयात NPCDCS कार्यक्रमांतर्गत प्राप्त अनुदानातून गर्भाशय मुख कर्करोग निदान व उपचारासाठी लागणाऱ्या आवश्यक यंत्रसामुग्री सिंधुदूर्ग, नाशिक, नांदेड, लातूर, अहमदनगर, पुणे, नंदुरबार, जालना, वाशिम, रत्नागिरी, चंद्रपूर, अमरावती व हिंगोली या १३ जिल्ह्यांसाठी खरेदी करण्याकरीता अंदाजित रक्कम रु.२२६.०३ लक्ष इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांनी शासनास सादर केलेला आहे. सदर खरेदी प्रस्तावास आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने

सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांनी सादर केलेल्या निविदा प्रक्रियाद्वारे खरेदी करण्याकरीता अंदाजित रक्कम रु.२२६.०३ लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबत लेखाशिर्षनिहाय अनुदान व खरेदी करावयाच्या उपरकरणे व साहित्य सामुग्री प्रस्तावाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. :-

अ- अनुदानाचा तपशिल

Sr. no	FMR Code	Name of Head	Approved Budget in PIP in 2019-20 (In Lakhs)	Procurement Proposal (In Lakhs)
1	FMR Code 6.1.1.23.c	Non-recurring Equipment at District NCD Clinic	317.20	226.03

ब- प्रस्तावित खरेदीचा तपशिल

Sr. No.	District	Digital Colposcope		Cryo cautery with probe		LEEP Procedure Instrument (Work station/ cart, LEEP Eletrodes/ Smoke Evacuator etc.)		Total Amt. (in Rs.)
		Qty.	Unit Cost (In Rs)	Qty.	Unit Cost (In Rs)	Qty.	Unit Cost (In Rs)	
			A		B		C	**D=A+B+C**
1	सिंधुदुर्ग	1	500000	1	250000	1	988750	1738750
2	नाशिक	1	500000	1	250000	1	988750	1738750
3	नांदेड	1	500000	1	250000	1	988750	1738750
4	लातूर	1	500000	1	250000	1	988750	1738750
5	अहमदनगर	1	500000	1	250000	1	988750	1738750
6	पुणे	1	500000	1	250000	1	988750	1738750
7	नंदुरबार	1	500000	1	250000	1	988750	1738750
8	जालना	1	500000	1	250000	1	988750	1738750
9	वाशिम	1	500000	1	250000	1	988750	1738750
10	रत्नागिरी	1	500000	1	250000	1	988750	1738750
11	चंद्रपुर	1	500000	1	250000	1	988750	1738750
12	अमरावती	1	500000	1	250000	1	988750	1738750
13	हिंगोली	1	500000	1	250000	1	988750	1738750
Total		**13**	**6500000**	**13**	**3250000**	**13**	**12853750**	**22603750**

सदरची प्रशासकीय मान्यता पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) सदर उपरकरणे व साहित्य सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू उपकरणे व साहित्य सामुग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच,

सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी कृती आराखडा सन २०१९-२० मध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत Non-recurring Equipment at District NCD Clinic अंतर्गत FMR Code 6.1.1.23.c या लेखाशिर्षांतर्गत रु.३१७.२० लक्ष इतक्या अनुदानातून भागविण्यात यावा. सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.खरेदी - २०१६/प्र.क.२४०/आरोग्य-८ दिनांक २६ जुलै,२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201903281117213217 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH MADHUKAR FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.06.14 12:12:24 +05'30'

(निलेश फाळके)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)